10.

# बौध्द धम्म चळवळीत प्राचीन विद्यापीठाचे योगदान

**प्रा. सकरगे नागोराव विठ्ठलराव**
दिगंबरराव बिंदू महाविद्यालय भोकर ता. भोकर जि. नांदेड

सिध्दार्थ गौतम बुध्दाचा जन्म इ.स.पूर्व. ५६३ मध्ये वैशाखी पोर्णिमेला कपीलवस्तु राज्यातील लुंबिनी वनात (नेपाळ)येथे झाला. शाक्य वंशातील पिता शुध्दोधन व माता महामाया यांच्या पोटी झाला. त्यांच्या जन्मावेळी एका विद्वान ऋषीने भविष्य सांगितले की, हे बालक गृहस्थाश्रमी राहिले तर चक्रवर्ती राजा होईल आणि गृहत्याग केला तर सम्यक संबुध्द होईल. पुढे पाण्याच्या वादावरुन सिध्दार्थ गौतमाने गृहत्याग केला आणि कठोर तपश्चर्यनंतर त्यांना बौध्दत्त्व प्राप्त झाले. दु:खाच्या मूळ कारणांचा सिध्दार्थ गौतमाला शोध लागला. या ज्ञानप्राप्तीचा मार्ग साधा आणि सोपा आहे फक्त तेथपर्यंत पोहचण्यास विलंबमात्र लागतो. त्यासाठी शील, समाधी, प्रज्ञा याचे काटेकोर पालन करू न कोणीही बुध्दत्त्व प्राप्त करू शकतो. बुध्दाने बोधिसत्व होण्यासाठीचा सरळ मार्ग दाखविला. यासाठी दहा पारमीता पूर्ण करण्यावर भर दिला. पारमिता म्हणजे पूर्णत्व याबरोबरच चार अर्यसत्य आणि आष्टांगिक मार्गाचा अवलंब करण्यास बुध्द सांगताना भगवान बुध्द धम्म-सार व धम्म-चर्चा या ग्रंथात लेखक आनंद बौध्द धम्म के बारे में लिखते है | की, बुध्द धर्म के अनुसार निसर्ग नियामता धम्म है अर्थात प्रकृति के नियम के अनुसार आचरण करना.

दोन हजार पाचशे वर्षापूर्वी बौध्द धर्माचा उदय झाला आणि जगभरात बौध्द धम्माचा प्रसार आणि प्रचार मोठया प्रमाणावर झाला. हजारो वर्षाच्या इतिहासात बौध्द धम्माचे मोठया प्रमाणावर दोन वेळा पूनरुजीवन झाले ते म्हणजे सम्राट अशोकाच्या काळात आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या काळात बाबासाहेबांच्या काळाचे एक विशेष वैशिष्टये म्हणजे लाखो जनसमुदायाने एकाच वेळी धम्म स्वीकारण्याची घटना ही लक्षणीय आहे. कारण बुध्दाच्या काळातही अशा एकाच वेळी लाखो समुदायाने धम्म स्वीकारल्याची घटना घडलेली दिसून येत नाही. प्रस्तुत शोधाभ्यासाच्या अनुषंगाने बौध्द धम्माचे सारांशरुपाने केलेले हे विवेचन असून बुध्द धम्माच्या चळवळीच्या योगदानामध्ये प्राचीन बौध्द विद्यापीठाचे सारांश रुपाने असलेल्या योगदानाचे स्वरुप शोधण्याचा प्रयत्न केला आहे.

प्राचीनकाळातही बुध्दाने शिक्षणाचा व्यापक प्रमाणात प्रसार आणि प्रचार केलेला दिसून येतो. खऱ्या अर्थाने शिक्षणाचा इतिहास बुध्द काळापासूनच सुरु होतो. प्राचीन बौध्द विद्यापीठामध्ये प्रमुख सहा विद्यापीठाचे महत्त्वपूर्ण असे योगदान आहे. त्यात तक्षशिला, नालंदा, विक्रमशिला, वल्लभी, उदन्तपुरी आणि जगद्दल अशा या सहा बौध्द विद्यापीठाचे योगदान शिक्षणाच्या अनुषंगाने आणि बौध्द धर्माच्या वाढीनुषंगाने महत्त्वाचे आहे. बौध्द विद्यापीठाच्या ख्यातीच्या अनुषंगाने माणिक गजभिये लिहितात 'बौध्द विश्वविद्यापिठांची ख्याती देश विदेशात झाली होती.

भारतातील प्रमुख विद्यापीठापैकी बौध्द धम्माचा प्रचार आणि प्रसार करण्यामध्ये सहा विद्यापीठाचे योगदान महत्त्वाचे ठरले. त्यात प्रथम तक्षशिला विद्यापीठ हे बौध्द काळातील सर्वात प्राचीन विद्यापीठ होते. या विद्यापीठाचा कालखंड हा इ.स.पूर्व ८०० ते इ.स.४०० असा असून नागराज तक्षक यांनी वसवलेल्या नगरात हे विद्यापीठ होते. सातव्या शतकातही हे विद्यापीठ शिक्षणाचे महत्त्वपूर्ण केंद्र होते. देश-विदेशातून विद्यार्थी येथे शिक्षणासाठी येत होते. अलेक्झांडरच्या आक्रमनावेळी हे विद्यापीठ जगविख्यात होते. हे विद्यापीठ पाकिस्तानमधील रावळपिंडी शहराच्या वीस मैल अंतरावर असून सम्राट अशोकाने या विद्यापीठात धर्मराजिक स्तुपाची स्थापना केली होती. या विद्यापीठात कला आणि साहित्याचे शिक्षण दिले जाई. पाणिनी, कौटिल्य, चंद्रगुप्त, अंगुलीमाल या आपापल्या क्षेत्रातील महारथिंनी या विद्यापीठात शिक्षण घेतले. तसेच हयू-एन-त्संग यांच्यामते कुमारलब्ध हे तक्षशिलाचे रहिवाशी होते. याबरोबरच कौटिल्याचे सहकारी विष्णू शर्मा, कनिष्क या बौध्द राजाचा वैद्य महर्षी चरक व सुश्रुत, कोसल राजा प्रसेनजितचे सहकारी महाली लिच्छवी, ब्राम्हण कल्पकुमार, उद्दालक आणि श्वेतकेतू, बंधुलमल्ल, खगोलशास्त्रज्ञ वराह मिहीर, ब्राम्हण पुत्र कण्हदिन्न यांनीही तक्षशिला विद्यापीठात शिक्षण घेतल्याचे उल्लेख आढळतात. बौध्द धम्म प्रचार आणि प्रसाराच्या चळवळीत महत्त्वपूर्ण अखिल विश्वाला शांतीचा संदेश देणाऱ्या महान शांतीदूताचा म्हणजेच सिध्दार्थ गौतम बुध्दाचा जन्म इ.स.पूर्व. ५६३ मध्ये वैशाखी पोर्णिमेला कपीलवस्तु राज्यातील लुंबिनी वनात (नेपाळ) येथे झाला. शाक्य वंशातील पिता शुध्दोधन व माता महामाया यांच्या पोटी झाला. त्यांच्या जन्मावेळी एका विद्वान ऋषीने भविष्य सांगितले की, हे बालक गृहस्थाश्रमी राहिले तर चक्रवर्ती राजा होईल आणि गृहत्याग केला तर सम्यक संबुध्द होईल. पुढे पाण्याच्या वादावरुन

सिध्दार्थ गौतमाने गृहत्याग केला आणि कठोर तपश्चर्यनंतर त्यांना बौध्दत्त्व प्राप्त झाले. दु:खाच्या मूळ कारणांचा सिध्दार्थ गौतमाला शोध लागला. या ज्ञानप्राप्तीचा मार्ग साधा आणि सोपा आहे फक्त तेथपर्यंत पोहचण्यास विलंबमात्र लागतो. त्यासाठी शील, समाधी, प्रज्ञा याचे काटेकोर पालन करू न कोणीही बुध्दत्त्व प्राप्त करू शकतो. बुध्दाने बोधिसत्व होण्यासाठीचा सरळ मार्ग दाखविला. यासाठी दहा पारमीता पूर्ण करण्यावर भर दिला. पारमिता म्हणजे पूर्णत्त्व याबरोबरच चार अर्यसत्य आणि आष्टांगिक मार्गाचा अवलंब करण्यास बुध्द सांगताना भगवान बुध्द धम्म-सार व धम्म-चर्चा या ग्रंथात लेखक आनंद बौध्द धम्म के बारे में लिखते है | की, बुध्द धर्म के अनुसार निसर्ग नियामता धम्म है अर्थात प्रकृति के नियम के अनुसार आचरण करना.

२५०० वर्षापूर्वी बौध्द धर्माचा उदय झाला आणि जगभरात बौध्द धम्माचा प्रसार आणि प्रचार मोठया प्रमाणावर झ ाला. हजारो वर्षाच्या इतिहासात बौध्द धम्माचे मोठया प्रमाणावर दोन वेळा पूनरुजीवन झाले ते म्हणजे सम्राट अशोकाच्या काळात आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या काळात बाबासाहेबांच्या काळाचे एक विशेष वैशिष्टये म्हणजे लाखो जनसमुदायाने एकाच वेळी धम्म स्वीकारण्याची घटना ही लक्षणीय आहे. कारण बुध्दाच्या काळातही अशा एकाच वेळी लाखो समुदायाने धम्म स्वीकारल्याची घटना घडलेली दिसून येत नाही. प्रस्तुत शोधाभ्यासाच्या अनुषंगाने बौध्द धम्माचे सारांशरुपाने केलेले हे विवेचन असून बुध्द धम्माच्या चळवळीच्या योगदानामध्ये प्राचीन बौध्द विद्यापीठाचे सारांश रुपाने असलेल्या योगदानाचे स्वरुप शोधण्याचा प्रयत्न केला आहे.

भारतातील महान समाज सुधारकांनी जसे शिक्षणाच्या अनुषंगाने महत्त्व जाणले होते त्याचप्रमाणे प्राचीनकाळातही बुध्दाने शिक्षणाचा व्यापक प्रमाणात प्रसार आणि प्रचार केलेला दिसून येतो. खऱ्या अर्थाने शिक्षणाचा इतिहास बुध्द काळापासूनच सुरु होतो. प्राचीन बौध्द विद्यापीठामध्ये प्रमुख सहा विद्यापीठाचे महत्त्वपूर्ण असे योगदान आहे. त्यात तक्षशिला, नालंदा, विक्रमशिला, वल्लभी, उदन्तपुरी आणि जगद्दल अशा या सहा बौध्द विद्यापीठाचे योगदान शिक्षणाच्या अनुषंगाने आणि बौध्द धर्माच्या वाढीनुषंगाने महत्त्वाचे आहे. बौध्द विद्यापीठाच्या ख्यातीच्या अनुषंगाने माणिक गजभिये लिहितात 'बौध्द विश्वविद्यापिठांची ख्याती देश विदेशात झाली होती. भारत हा देश शिक्षण ज्ञान-दर्शन आणि विज्ञानाचे प्रमुख केंद्र बनले होते. या विद्यापीठातील शिक्षित विद्यार्थ्यांना सर्वश्रेष्ठ दर्जा मिळत असे. त्याच प्रकारे विद्वान भिक्षूच्या व्दारे बौध्द धर्माच्या शिकवणी आणि ज्ञानाची सर्वत्र प्रशंसा होत होती.

बौध्द धम्माचा प्रचार आणि प्रसार करण्यामध्ये भारतातील प्रमुख विद्यापीठापैकी ६ विद्यापीठाचे योगदान महत्त्वाचे ठरले. त्यात प्रथम तक्षशिला विद्यापीठ हे बौध्द काळातील सर्वात प्राचीन विद्यापीठ होते. या विद्यापीठाचा कालखंड हा इ.स.पूर्व ८०० ते इ.स.४०० असा असून नागराज तक्षक यांनी वसवलेल्या नगरात हे विद्यापीठ होते. सातव्या शतकातही हे विद्यापीठ शिक्षणाचे महत्त्वपूर्ण केंद्र होते. देश-विदेशातून विद्यार्थी येथे शिक्षणासाठी येत होते. अलेक्झांडरच्या आक्रमनावेळी हे विद्यापीठ जगविख्यात होते. हे विद्यापीठ पाकिस्तानमधील रावळपिंडी शहराच्या वीस मैल अंतरावर असून सम्राट अशोकाने या विद्यापीठात धर्मराजिक स्तुपाची स्थापना केली होती. या विद्यापीठात कला आणि साहित्याचे शिक्षण दिले जाई. पाणिनी, कौटिल्य, चंद्रगुप्त, अंगुलीमाल या आपापल्या क्षेत्रातील महारथिंनी या विद्यापीठात शिक्षण घेतले. तसेच हयू-एन-त्संग यांच्यामते कुमारलब्ध हे तक्षशिलाचे रहिवाशी होते. याबरोबरच कौटिल्याचे सहकारी विष्णू शर्मा, कनिष्क या बौध्द राजाचा वैद्य महर्षी चरक व सुश्रुत, कोसल राजा प्रसेनजितचे सहकारी महाली लिच्छवी, ब्राम्हण कल्पकुमार, उद्दालक आणि श्वेतकेतू, बुंधुलमल्ल, खगोलशास्त्रज्ञ वराह मिहीर, ब्राम्हण पुत्र कण्हदित्र यांनीही तक्षशिला विद्यापीठात शिक्षण घेतल्याचे उल्लेख आढळतात. बौध्द धम्म प्रचार आणि प्रसाराच्या चळवळीत महत्त्वपूर्ण व्यक्ती याच विद्यापीठातून स्नातक झाल्याचा उल्लेख सापडतो. त्यात जिवक वैद्य, अंगुलीमाल, महाही लिच्छिवी, राजा प्रसेन्नजित, बंधुल मल्ल इ. अनेक बुध्द धम्माचे अनुयायी याच विद्यापीठातून स्नातक झालेले दिसतात.

प्राचीन बौध्द विद्यापीठापैकी नालंदा हे विद्यापीठ बुध्दाचे शिष्य सारीपुत्त यांचे बीहार राज्यातील नालंदा हे जन्म स्थान होते. या शहराची भिन्न-भिन्न नामांतरे अढळतात. इ.स. ४१० मध्ये चीन प्रवासी फहियान यांनी नालंदाला भेट दिल्याचा उल्लेख आहे. तसेच इ.स. ३२० च्या दरम्यान नागार्जून आणि आर्यदेव हे दोन पंडीत याच विद्यापीठातून स्नातक झाले होते. बैध्द धर्माशिवाय जैन, हिंदू धर्माचेही तत्त्वज्ञान नालंदा विद्यापीठातून शिकवले जाई. या विद्यापीठाला ऋषीतुल्य आचार्यांचीही परंपराअसून या विद्यापीठात चीन, थाईलंड, श्रीलंका, कोरीया, इत्यादी देश-विदेशातून विद्यार्थी ज्ञ ानार्जनासाठी येत होते. या विद्यापीठाच्या समृध्दीसाठी सम्राट हर्षवर्धनांनी ५०% रक्कम दान म्हणून दिली होते, हयू-एन-त्संग यांचा भारत भेटीत बौध्द धर्माचे अध्ययन आणि धार्मिक स्थळांना भेटी देणे हा उद्देश होता. इ.स. १२०० च्या सुमारास मुहमंद बिन बखत्यार खिलजीने धर्मांध भावनेतून नालंदा विद्यापीठाचा विध्वंस केला आज या विद्यापीठाचे अवशेष दुर्लभ आहेत.

भारतीय पुरातत्वविभागाने नालंदाचे उत्खनन करुन भारतातील पहिले विद्यापीठ म्हणून संपूर्ण जगाला सांगितले या विद्यापीठातून सारीपुत्र या बुध्दाच्या शिष्याने व्याकरणाचे धडे घेतले होते. तसेच नागार्जून हा बौध्द दर्शनामध्ये शुन्यवादाचे प्रर्वतक मानला जाणारा विद्वान याच विद्यापीठात शिकला. 'शुन्यवाद' आणि 'विज्ञानवादाचा' प्रसार करणारा महापंडीत आचार्य धर्मपाल, तिबेटमध्ये बौध्द धर्म प्रस्तापित करणारा आचार्य पद्मसंभव, चीनमध्ये बौध्द धर्माचा प्रसार करणारे आचार्य वज्रबोधी, माध्यमिक संप्रदायाचे आचार्य आर्यदेव प्रवर्तक मानले जातात. आचार्य जयदेवांनी धर्मपालानंतर नालंदा विद्यापीठाचे कुलपती म्हणून कार्यभार स्वीकारला. हिनयान आणि महायान याचे तुलनात्मक अध्ययन आचार्य प्रभाकर मित्र यांनी केले. तसेच चीनमध्ये जाणारे ते पहिले भारतीय विद्वान म्हणून प्रसिध्द आहेत.

ज्ञानवृध्दीसाठी भारतभर प्रवास करणारे रत्नसिंह, न्यायशास्त्राचे महान विद्वान पंडीत जयसेन तिबेटमध्ये कागयुप संप्रदायाची स्थापना करणारे मारपा, बौध्दधर्म प्रसारक महागुरु धर्मदेव, बैध्द धम्माच्या प्रचार व प्रसार कार्यात आपले जीवन सर्मपित करणारे दिग्नाक, शास्त्रार्थात विजय प्राप्त केलेले विद्वान कमलशिल, बौध्द दर्शनाला नवी दिशा देणारे विद्वान पंडीत असंग तसेच अनेक ग्रंथाची निर्मिती करुन बौध्द दर्शनावर महान कार्य करणारे वसुबंधू, बुध्दाच्या सिध्दांतावर विवेचन करुन तर्कशास्त्रला ज्ञान क्षेत्रात वेगळे स्वरुप प्राप्त करुन देणारे धर्मकिर्ती आणि शांतीरक्षित यांनी तिबेटमध्ये बौध्द धम्माचा प्रसार आणि प्रचार केलेला दिसून येतो. आचार्य शांतिदेव यांनी बौध्द धम्माची दीक्षा घेऊन महान असे कार्य केले. श्रीज्ञान दिपंकर अतिश, बौध्द धम्म व दर्शनाचे फार मोठे पंडीत होते यांनी बौध्द धम्माचा प्रसार व प्रचार केला. चंद्रकिर्ती या नालंदा विद्यापीठाच्या संघनायकाने बौध्द धर्माची दीक्षा घेऊन धम्माचा प्रचार आणि प्रसार केला. तसेच चंद्रगीमीन या विद्वान व्याकरणकाराने बुध्दपालीत व नागार्जुनाच्या सिध्दांतानुसार शास्त्रार्थ केला होता. वरील सर्व विद्वान पंडीतांनी आपआपल्या क्षेत्रामध्ये वाद-विवाद शास्त्रार्थ करण्यात नालंदा विद्यापीठामध्ये हे पंडीत प्रसिध्द होते. बौध्द धम्म प्रचार आणि प्रसाराच्या कार्यात नालंदा विद्यापीठातील एकूणच स्नातकांनी महान असे कार्य केलेले दिसून येते.

भारतातील प्रसिध्द महाविहारापैकी (वल्लभी महाविहार) वल्लभी विद्यापीठ सर्वात जास्त प्रसीध्द होते. या विद्यापीठाने बौध्द धर्माच्या हीनयान (थेरवाद) शाखेचे केंद्र विकसित केले. या पंथाच्या प्रचार प्रसारासाठी मोलाचे योगदान दिले. मैत्रक राजाच्या राजाश्रयामुळे सातव्या शतकात या विद्यापीठाची ख्याती सर्वदूर पसरली. नालंदा विद्यापीठासारखेच हे वल्लभी विद्यापीठ बौध्द धर्माचे विद्याकेंद्र म्हणून प्रसिध्द होते. स्थिरमती आणि गुणमती यासारखे प्रख्यात पंडीत या विद्यापीठाला लाभले होते. या विद्यापीठाला अनेक राजानी मदत केल्यामुळे या विद्यापीठाची किर्ती सर्वदूर पसरली होती.

बौध्द धर्मानुयायी राजा धर्मपाल यांनी स्थापन केलेले हे मगध प्रांतातील दुसरे प्रसिध्द बौध्द विद्यापीठ होय. राजा धर्मपाल यांनी नालंदा विहाराच्या पुनरुजीवना बरोबरच अनेक विद्यार्थ्यांना उदार मनाने राजाश्रय दिला. या विद्यापीठाचे तीबेटशी चांगले संबंध होते. साधारणता इ.स. ७६९ ते ८१५ या काळात धर्मपाल राजाने गंगानदीच्या किनाऱ्यावर सुंदर विहार बनवीले तेच पुढे विक्रमशिला विद्यापीठ झाले. या विद्यापीठाचे दिपंकर श्रीज्ञान विक्रमशिला यांना तिबेटमधील बौध्द धर्मातील विस्कटलेली घडी बसविण्यासाठी अमंत्रित केले होते. या विद्यापीठातील पर्डीतांनी बौध्द धर्मग्रंथाचे तिबेटी भाषेत रुपांतर केल्यामुळे ते ग्रंथ सुरक्षित राहीले. या विद्यापीठाने ज्ञानाच्या क्षेत्रात विशेष योगदान दिले आहे. दर्जेदार स्वरुपाचे शिक्षण देणाऱ्या या विद्यापीठाने बौध्द धर्माच्या प्रसाराच्या इतिहासात स्वतःचे वेगळे स्थान निर्माण केले होते. या विद्यापीठातील व्दारपाल पंडितामध्ये रत्नाकर शांती, वागीश्वर किर्ती, नरोपा, प्रज्ञाकरमती, रत्नव्रजा, ज्ञान श्री मित्र, सिंहभद्र, सागरमेध, बुध्दज्ञानपाद, प्रज्ञारक्षित, बुध्दश्री, शाक्यश्रीभद्र, दिपंकर अतिश, आचार्य आनंदगर्भ इत्यादी पंडीतांबरेबरच या विद्यापीठाचे विद्यार्थी भारतातच नव्हे तर बाहेरील अनेक देशात बौध्द धर्माच्या प्रचार आणि प्रसारासाठी जात आसत. या विद्यापीठांतर्गत सहा महाविद्यालय असून सूर्य प्रकाशासारखे संपूर्ण विश्वात बैध्द धर्माचे ज्ञान पसरविण्याचे काम या विद्यापीठाने केलेले दिसते.

जगद्दल विद्यापीठ हे तत्कालीन बंगालमध्ये पाल वंशीय राजाने स्थापन केलेले हे बौध्द ज्ञानाचे अंतिम महान केंद्र म्हणून प्रसिध्द होते. राजा रामपाल यांनी रामावती नगरीत हया विद्यापीठाची स्थापना केली. बौध्द धर्मिय विद्वानांचे हे मुख्य आश्रयस्थळ म्हणून आणि बौध्द ज्ञानाचे हे महान केंद्र म्हणून प्रसिध्द होते. कश्मिरी भिक्षू शक्य श्रीभद्र हे विद्याकेंद्र पाहण्यासाठी आल्याचा उल्लेख आहे. या विद्यापीठातील शुभांकर गुप्त हा बौध्द भिक्षू प्रसिध्द विद्वान म्हणून नाव लौकिक मिळविले होते. तसेच मोक्षकार गुप्त हे या विद्यापीठाचे कुलपती होते. हे प्राचीन परंपरांचे प्रकांड पंडीत म्हणून प्रसिध्द होते. या वरुन या विद्यापीठाची गौरवशाली परंपरा सहज लक्षात येते या विद्यापीठाने जवळपास दोनशे पंन्नास वर्ष ज्ञानार्जनाचे कार्य केलेले दिसते. इ.स. १२०३ साली बखत्यार खिलजीने हया विद्यापीठाची गौरवशाली परंपरा नष्ट करुन उध्वस्त केले.

प्राचीन बौध्द विद्यापीठाने बौध्द धर्माच्या वाढीसाठी चालवलेली ही विद्यापीठीय शिक्षणाची परंपरा गौरवशाली वाटते. कारण ज्याप्रमाणे ख्रिस्तीधर्म प्रसारक कार्य करण्यासाठी महाविद्यालय चालवतात त्यातून आर्थिक फायदा घेवून धर्म

प्रसारासाठी ऊर्जा मिळवतात त्या हेतूनेच बुध्द कालीन बौध्द राजाने शिक्षणासारख्या महान उपक्रमासाठी, धर्मप्रसारासाठी राजाश्रय देऊन बौध्द धर्माच्या प्रचार आणि प्रसारासाठी महान असे कार्य केलेले दिसून येते.

**संदर्भ ग्रंथ :-**


१) भगवान बुध्द धम्म-सार व धम्म-चर्या, अनंद (श्रीकृष्ण) समृध्द भारत प्रकाशन, मुंबई २००१

२) प्राचीन भारतातील प्रमुख बौध्द विद्यापीठे, डॉ. माणिक गजभीये, पारमिता प्रकाशन नागपूर २००९

३) डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची भाषणे भाग-०३, १९४६-५६, डॉ. बाबासाहेब आंबेडकर चरित्र साधने प्रकाशन समिती महाराष्ट्र शासन मुंबई २००२.

४) बुध्द विचार: मार्क्सवादी दृष्टिक्षेप - राहूल सांस्कृत्यायन आणि इतर लोकवांड्:यगृह मुंबई.

५) प्राचीन भारत का इतिहास- माणिक लाल गुप्त, एटलांटीक पब्लीशर्स एण्ड डिस्ट्रीब्यूटर्स नई दिल्ली २००३.

६) प्राचीन भारत - डॉ. धनंजय आचार्य , साईनाथ प्रकाशन नागपूर २००५.

७) भारताचा इतिहास- प्रभाकर सपकाळ, एस शब्बीर, मदन मार्डीकर, एस चंद्र आणि कं. लि. नई दिल्ली. १९९४.


❑❑❑